अंक ०७
एप्रिल २०२५

Issue 07
April 2025




## या अंकात | In this issue

उपक्रमाबद्दल /
About the Initiative

भाषांच्या संगमात मला उमगलेली मी
- तारा विंजणेकर/प्रभा कुलकर्णी

Somewhere between languages, I found myself - Tara Vinzanekar

अपभ्रंश: भाषा आणि साहित्य - सुशान्त देवळेकर

Apabhramsha: Language and Literature - Sushant Devlekar/Prabha Kulkarni

Learn a Marathi word:
वाडा / *Wada* (vāḍā)

## उपक्रमाबद्दल

मराठी भाषा, साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा फ्लेम विद्यापीठातील विविध भाषा-संस्कृतींचा भाग असलेल्या अभ्यासकांना परिचय करून देण्यासाठी, तसेच महाराष्ट्र आणि मराठी यांविषयीच्या अभ्यासात सर्वांना सामील करून घेण्यासाठी मराठी भाषा आणि साहित्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

आज शिक्षणक्षेत्रामध्ये प्रादेशिक भाषांचा वापर आणि त्यांचा अभ्यास कमी होत चालला आहे. ही गरज ओळखून, ज्ञानाच्या, आणि सामाजिक व सांस्कृतिक अभ्यासाच्या, उपयोजनाच्या संदर्भांत मराठी भाषा-साहित्याची जपणूक नि विकास यांसाठी प्रयत्न करायला हवेत. मराठीच्या अशा सर्वांगीण विकासासाठी मराठीविषयीच्या संशोधनास प्रोत्साहन आणि पाठिंबा देण्याच्या उद्देशाने फ्लेम विद्यापीठात मराठी भाषा-साहित्यविषयक उपक्रम राबवला जात आहे.

## About the Initiative

The Marathi Language and Literature Initiative at FLAME University aims to build a dedicated academic space to critically examine the diverse culture, traditions, and knowledge systems that exist within Maharashtra.

Critical engagement with languages from the region and their role in everyday communication — especially within academic spaces — is gradually diminishing. Recognizing this gap, the Marathi Language and Literature Initiative emphasizes the preservation, promotion and popularization of the Marathi language and culture.

मराठी भाषा-संस्कृती शिकवणे, तिचा प्रसार करणे, तिच्याविषयीच्या संशोधनाला चालना देणे या तीन घटकांना केंद्रस्थानी ठेवून, फ्लेममध्ये मराठीविषयक अभ्यासासाठी व देवाणघेवाणीसाठी एक अवकाश निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. मराठी भाषा-साहित्याविषयीच्या व्यापक चर्चेत योगदान देण्याचा आमचा उद्देश आहे. महाराष्ट्रातील विविध संस्कृतींचा, परंपरांचा आणि ज्ञानव्यवस्थांचा सखोल अभ्यास आणि चिकित्सा करण्यासाठी ज्ञानक्षेत्रात अनुकूल वातावरण निर्माण करणे हा मराठी भाषा आणि साहित्य उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

- डॉ. आशुतोष पोतदार

Through research and promotion of Marathi language and literature in the broad socio-cultural and educational contexts through various activities at the campus, we seek to introduce it to the multilingual and multicultural learners and audiences at FLAME in an inclusive and enriching environment.

Focusing on promotion, research, and pedagogy, the Marathi Language and Literature Initiative ensures that the Marathi language and culture are represented in the educational discourse and will maintain a vibrant presence at FLAME.

- Dr. Ashutosh Potdar

---

## भाषांच्या संगमात मला उमगलेली मी

इंग्रजी लेख: तारा विंजणेकर
मराठी अनुवाद: प्रभा कुलकर्णी

मी मुख्यतः इंग्रजी बोलणाऱ्यांच्या घरात वाढले — खरं तर, संपूर्णपणे इंग्रजीत बोलतात, अशा घरात वाढले. माझी आई मुंबईची पारशी, म्हणजे झोरास्ट्रियन धर्माचं पालन करणारी आहे, आणि वडील हिंदू आहेत. वडिलांकडून माझी आजी मुंबईची कोकणस्थ ब्राह्मण आणि आजोबा कर्नाटकमधील बेळगावचे गौड सारस्वत ब्राह्मण आहेत. त्यामुळे, माझ्या घरात सांस्कृतिक वैविध्य आहे, असं निश्चितच म्हणता येईल. आमचं घरातलं संभाषण जरी केवळ इंग्रजीत होत असलं, तरी वेगवेगळ्या भाषा शिकणं हे माझ्या बालपणात आणि माझ्या जडणघडणीत खूप महत्त्वाचं ठरलं आहे.

## Somewhere between languages, I found myself

Tara Vinzanekar

I grew up in a predominantly English-speaking household. And by predominantly, I mean entirely. My mother is a Parsi from Mumbai, following the Zoroastrian faith, and my father a Hindu. From my father's side, my grandmother is a Kokanastha Brahman from Mumbai and my grandfather a Gaud Saraswat Brahman, from Belgaum, Karnataka. So it's safe to say that I come from a very culturally varied home.



*My mother with her cousins*

मला मराठी बऱ्यापैकी समजतं आणि बोलता देखील येतं. आणि माझं हिंदी जरी परिपूर्ण नसलं, तरी भारतात वावरायला ते पुरेसं होतं. मी शाळेत बरीच वर्षं फ्रेंच शिकले असले, तरी आता मला “Comment ça va?”
(तू कसा / कशी आहेस?)

माझे आजी आणि आबा लहानपणी माझ्याशी फक्त मराठीतच बोलायचे आणि मी फक्त इंग्रजीत उत्तर द्यायचे. आता मी मराठीत उत्तरं देण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करते, आणि त्यामुळे दिवसेंदिवस माझं मराठी चांगलं होत आहे. मी जेव्हा-केव्हा बोलण्यात काही चूक करते, तेव्हा-तेव्हा आजी मला सुधारणा सुचवते. मराठी न बोलणाऱ्या लोकांना माझं मराठी अचूक वाटू शकतं, पण एखादा मराठी बोलणारा मात्र तसं म्हणणार नाही, याची खात्री आहे.



*My father’s parents and his cousins on his farm.*

मराठीत अनेक असे वाक्प्रचार आहेत, जे इंग्रजीत भाषांतरित करणं शक्यच नाही. खरं तर, सगळ्याच भाषांबाबत, भाषांतरानंतर शब्द कळतात पण त्यांचा नेमका अर्थ नीट लागत नाही असे होऊ शकते. या संदर्भात, माझा सगळ्यांत आवडता वाक्प्रयोग म्हणजे ‘राग येतोय’. ह्या वाक्प्रयोगाचा नेमका अर्थ म्हणजे रागाची भावना अनुभवणं. पण जेव्हा आपण ‘राग येतोय’ असं म्हणतो, तेव्हा असं वाटतं की जणू काही राग आपल्या मनात प्रवेश करत आहे! ही भावना इंग्रजीत व्यक्त करता येत नाही. माझं अजून एक आवडतं वाक्य म्हणजे ‘आई शप्पथ’. संदर्भानुसार याचा वापर आश्चर्य किंवा अविश्वास व्यक्त करण्यासाठी सुद्धा केला जाऊ शकतो.

Even though we spoke only English at home, learning different languages has been very integral to my childhood and in shaping the person I am today. I can understand and speak Marathi pretty well, and although my Hindi is far from perfect, it helps me get by in India easily. I spent a good part of my high school learning French, but if you ask me to speak the language, I’m not too sure I can go further than “Comment ça va?”.

My aaji and abba only spoke to me in Marathi when I was younger, and I used to reply only in English. I try my best to reply in Marathi now, and little by little, it’s getting better. Whenever I made a mistake in the language, she’d correct me. To someone who doesn’t speak Marathi, my tongue seems flawless, but I’m sure a native speaker would say the opposite.



*My aaji and abba on their wedding day*

There are so many phrases in Marathi that you just cannot translate into English. In every language, for that matter, the words make sense, but the true meaning does not translate. “Raag Yetoy (राग येतोय)” is a personal favourite of mine – which literally translates to “rage is coming”; this means I am angry of course, but the true feeling of the phrase cannot be communicated through English. Another favourite of mine, “aai shapath (आई शपथ)”, roughly translates to “I swear on my mother”.

अशा सगळ्या वाक्प्रचारांमुळे आपल्या भाषांमध्ये रंग चढतो, सूक्ष्म अर्थछटांची श्रीमंती येते आणि आपण स्वतःला चांगल्या प्रकारे व्यक्त करू शकतो — जे इंग्रजीत शक्य होत नाही. मी कितीही सहजपणे इंग्रजी बोलू शकत असले, तरी काही गोष्टी मला मराठीत बोलण्यानेच समाधान मिळतं.

आता मला लहानपणीपेक्षा मराठी बऱ्यापैकी चांगली वापरता येते, ह्याचा मला खूप अभिमान आहे. माझ्या आजी-आबांशी आणि मित्र-मैत्रिणींशी बोलताना मी मराठीच वापरते. मला हे जाणवतं की ही पुण्याची भाषा आहे आणि मराठी ही या संस्कृतीच्या अस्मितेचा भाग आहे. वडिलांच्या बाजूचं माझं कुटुंब मराठी बोलत असल्यामुळे माझा आता मराठीच्या अनेक बोलीभाषांशी परिचय झाला आहे. पण मला समजायला सोपी वाटणारी बोली ही पुण्यातली आहे.

मराठी भाषेबरोबरच्या माझ्या प्रवासाने मला माझ्या पाळा-मुळांशी आणि कुटुंबाशी अधिक खोलवर जोडून दिलं आहे. या भाषेमुळे मानवी नात्यांमधील सूक्ष्म पदर समजायला देखील मला मदत झाली आहे. या प्रवासाने मला असं लक्षात आणून दिलं आहे की भाषा केवळ संवाद साधण्यापुरती नसते, तर ती भावना आणि संस्कृती यांच्याशीही खोलवर जोडलेली असते. मला आता हे स्पष्ट कळलंय की इंग्रजीत व्यक्त होताना मला सहज वाटतं, पण माझ्या स्वतःच्या अस्तित्वाचे काही अंश हे मला मराठीत सापडले आहेत.

It’s phrases like these that colour our language, add nuance and help us find ways to express ourselves in a far better way than English ever can. As comfortable as English is for me, there are a few things that I can only say in Marathi; saying the same in English doesn’t satisfy.

I’m finally proud to say that I use my mother tongue far more now than I did when I was younger. I speak it with my grandparents and my friends at college. I know that it’s the language of Pune, and it's clear that its spirit runs among the people here. My family from my father’s side speak Marathi, so I’m accustomed now to a lot of different dialects, but the dialect that remains the easiest to follow, is one that comes from Pune.

My journey with Marathi has helped me connect more deeply with my roots and my family and has helped me discover the nuances that language brings to human connection. It’s shown me that it’s not only for communication, but is strongly grounded in emotion and culture as well. It’s clear that I’ve found great comfort in English, but it’s in Marathi that I’ve found parts of myself.


तारा विंजणेकर ही फ्लेम विद्यापीठात पदवी-स्तरावर द्वितीयवर्षामध्ये शिकत आहे. तिला संगीतामध्ये, विशेषतः गायनामध्ये रुची असून, तिने पियानो वादनामध्ये ट्रिनिटी कॉलेजच्या परीक्षांचे सातव्या श्रेणीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. तिला खेळणे, तसेच साहसी अनुभव घेणे प्रचंड आवडते.

प्रभा कुलकर्णी ही फ्लेमची माजी विद्यार्थी, लेखक आणि कलाकार आहे. तिला संग्रहालयशास्त्र, कला आणि संस्कृती यांमध्ये रस आहे.

Tara Vinzanekar is a second-year Undergraduate Level student at FLAME University. She loves music, singing and is a 7th Grade Trinity Pianist. She loves playing sports, is a total adrenaline-junkie and will find any excuse to be outdoors.

# अपभ्रंश: भाषा आणि साहित्य

सुशान्त देवळेकर

आजची मराठी भाषा ही ‘माहाराष्ट्री प्राकृत’ ह्या भाषेचेच आधुनिक काळातील रूप आहे, असे मानतात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देतानाही ‘माहाराष्ट्री प्राकृत — अपभ्रंश — मराठी’ अशी परंपरा गृहीत धरण्यात आली आहे. ‘अपभ्रंश’ भाषा व तिच्यातील साहित्य हा मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या विकासाच्या परंपरेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

ह्या टप्प्यांचा भाषाविज्ञानातील भाषाकुल (भाषांचे कुटुंब) ह्या संकल्पनेशी संबंध आहे. भाषाविज्ञानात भाषांचा तुलनात्मक अभ्यास करतात. म्हणजे, भाषांमध्ये काय समान आणि काय वेगवेगळे आहे ह्याचा, तसेच काळाच्या दृष्टीने आधी काय आणि नंतर काय असा अभ्यास करतात. मोठ्या प्रमाणात समानता आढळणाऱ्या भाषांचे एक कुल (कुटुंब) मानण्यात येते. ‘भारतीय-युरोपी’ (इंडो-युरोपियन) भाषाकुलाची ‘भारतीय-आर्य’ (इंडो-आर्यन) ही एक शाखा आहे. काळाच्या दृष्टीने, भारतीय-आर्य भाषांच्या प्राचीन, मध्यकालीन आणि अर्वाचीन अवस्था मानल्या जातात. ह्यांतील मध्यकालीन अवस्था साधारणतः सामान्यसन-पूर्व ६०० ते सन १२०० ह्या काळात होती. ह्या कालखंडाच्या वेगवेगळ्या टप्प्यांत भारतात पाली, अर्धमागधी, माहाराष्ट्री, शौरसेनी, पैशाची आणि अपभ्रंश ह्या भाषा प्रचलित होत्या, असे त्या कालखंडातील उपलब्ध साहित्यावरून लक्षात येते. ह्यांपैकी पाली ही बौद्धांच्या, तर अर्धमागधी ही जैनांच्या धर्मग्रंथांची भाषा होती. ह्या दोन भाषा वगळता वर नमूद केलेल्या इतर भाषांत प्राधान्याने साहित्य लिहिले जात होते. आधुनिक भाषाभ्यासकांच्या मते, अपभ्रंश हे मध्यकालीन भारतीय-आर्य भाषांच्या तिसऱ्या अवस्थेचे नाव आहे. अपभ्रंश ह्या अवस्थेतूनच मराठी, हिन्दी, गुजराती अशा अर्वाचीन भारतीय भाषा उदयाला आल्या अशी त्यांची धारणा आहे.

‘अपभ्रंश’ हे नाव व्याकरणकारांनी, साहित्यकारांनी आणि साहित्यशास्त्रकारांनी भाषेसंदर्भात वेगवेगळ्या अर्थांनी वापरलेले दिसते. पाणिनीच्या अष्टाध्यायी ह्या व्याकरणावर सामान्यसन-पूर्व २००च्या सुमारास पतंजलींनी लिहिलेल्या महाभाष्यात ‘अपभ्रंश’ हा शब्द ‘प्रमाणेतर (मान्य नसलेले) शब्दप्रयोग’ दर्शवण्यासाठी वापरला आहे. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात (सुमारे सामान्यसन-पूर्व २०० ते सन ३००च्या दरम्यान) ‘अपभ्रंश’ हा शब्द येत नाही.

# Apabhramsha: Language and Literature

**Original Marathi: Sushant Devlekar**
**English Translation: Prabha Kulkarni**

It is believed that the Marathi we speak today is a modern version of the language, Maharashtri Prakrit. Even when Marathi was declared as a Classical Language, the linguistic evolution of Maharashtri Prakrit to Apabhramsha to Marathi was acknowledged. The language and literature of Apabhramsha poses an important stage in the development of Marathi language and literature.


This stage comes through in the concept of language families in linguistics. The subject includes a comparative study of languages, analysing their similarities and differences, along with their chronological development. The languages which showcase many similarities are considered to be a part of the same language family. The Indo-European language family includes a branch of languages known as the Indo-Aryan languages. This branch of Indo-Aryan languages is categorised into three stages: Ancient, Medieval and Modern. The Medieval stage spans from around 600 BCE to 1200 CE. Looking at literary evidence from this period, it is found that languages like Pali, Ardhamagadhi, Maharashtri, Shauraseni, Paishachi, and Apabhramsha were in use in India at various phases. Amongst these, Pali was the language of Buddhist texts while Ardhamagadhi was used in Jain texts. Apart from these, the rest of the mentioned languages were used mainly for literary-writings. Modern linguists consider Apabhramsha as part of the third phase of the medieval Indo-Aryan Languages. Modern languages like Marathi, Hindi and Gujarati have evolved from this phase of Apabhramsha.

The term “Apabhramsha” has been used differently by grammarians, authors and scholars. Patanjali’s commentary on Panini’s

पण नाट्यशास्त्रात उद्धृत केलेल्या काही श्लोकांच्या भाषेची वैशिष्ट्ये ही अपभ्रंश भाषेच्या वैशिष्ट्यांशी जुळणारी आहेत. ही भाषा 'आभीर' ह्या पशुपालक जमातीची असल्याचा उल्लेख नाट्यशास्त्रात येतो. ह्यावरून सुरुवातीच्या कालखंडात, अपभ्रंश ह्या भाषेला फारशी प्रतिष्ठा नव्हती, असे लक्षात येते.

मात्र पुढे सहाव्या शतकापर्यंत अपभ्रंश भाषेला साहित्यक्षेत्रात प्रतिष्ठा मिळाल्याचे आढळते. सौराष्ट्रातील वल्लभीचा राजा दुसरा धरसेन ह्याच्या ताम्रपटात त्याने, 'आपण संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश ह्या तीनही भाषांत काव्य करू शकतो' हे मोठ्या गौरवाने नोंदवले आहे. भामह आणि दण्डी ह्या संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी, साहित्याचे वर्गीकरण करताना अपभ्रंश भाषेतल्या साहित्याचा स्वतंत्र वर्ग मानला आहे. म्हणजेच, इथे अपभ्रंश भाषेचा विशिष्ट जमातीची बोली म्हणून नव्हे, तर संस्कृत आणि प्राकृत ह्यांच्या जोडीने एक स्वतंत्र भाषा म्हणून उल्लेख येतो.

नवव्या शतकातील रुद्रट ह्या साहित्यशास्त्रकाराच्या *काव्यालंकार* ह्या ग्रंथात अपभ्रंश हा प्रदेशविशिष्ट भाषाभेद मानल्याचे आढळते. दहाव्या शतकात राजशेखर ह्या साहित्यशास्त्रकाराने अपभ्रंशाला संस्कृत आणि प्राकृत ह्यांच्या तोडीची साहित्यिक भाषा मानले आहे. अकराव्या शतकातील पुरुषोत्तम ह्या प्राकृत भाषेच्या व्याकरणकाराने अपभ्रंशाचा उल्लेख 'तत्कालीन शिष्टांची (त्या काळातील समाजात मान्यता असलेल्या लोकांची) बोली' असा केला आहे. तसेच रुद्रटाच्या *काव्यालंकार* ह्या ग्रंथाचा टीकाकार नमिसाधुने म्हटले आहे की, "अपभ्रंश ही मुख्यत्वे प्राकृत म्हणजे माहाराष्ट्री आहे."




मौजेची गोष्ट म्हणजे, अपभ्रंशात लेखन करणाऱ्या लेखकांनी आपल्या भाषेला 'देशी' असे म्हटले आहे. आपल्या बोलण्यातील भाषेचा 'देशी' किंवा 'देशी भाषा' असा उल्लेख करण्याची अपभ्रंशातील ही पद्धती पुढे अर्वाचीन भारतीय-आर्य भाषांपर्यंत सुरू राहिलेली दिसते. उदाहरणार्थ, संत ज्ञानदेवांनी ज्ञानदेवी ह्या ग्रंथात मराठीचा उल्लेख 'देशी' ह्या शब्दानेही केला आहे.

grammar treatise *Ashtadhyayi*, written around 200 BCE, refers to the word Apabhramsha as non-standard or non-normative usage in language. The word does not appear in *Natyashastra* written by Bharat (circa 200 BCE to 300 CE), but some of the features of the language used to write some of the verses quoted in *Natyashastra* align with that of Apabhramsha. *Natyashastra* mentions that this language belongs to a community of pastoralists called the tribe of Abhira. This notes that Apabhramsha did not have much prestige during its early phase in this period.

However, the Apabhramsha language had gained a lot of recognition by the 6th century CE in literary circles. King Dharsena II of Sourashtra's Vallabhi proudly states in a copper plate inscription that he could compose verses in all three languages, that is, Sanskrit, Prakrit and Apabhramsha. Sanskrit literary scholars like Bhamaha and Dandi have distinctly categorised Apabhramsha as having a separate language and literature. This implies that Apabhramsha language, in this period, was not considered only the dialect of a community but had gained the status of a separate language, on par with Sanskrit and Prakrit.

Rudrata in 9th Century CE classified Apabhramsha as a region-specific language variety. Rajshekhar in 10th Century CE considered it as a language of literary importance, equal to Sanskrit and Prakrit. Purushottam, a Prakrit grammarian in the 11th Century CE, mentioned Apabhramsha as the 'spoken language of the elite (or an acceptable section of society at the time)'. Nevertheless, Namisadhu critiqued Rudrata's work, stating that Apabhramsha was predominantly a Maharashtri variety of the Prakrit language.

Interestingly, authors who used Apabhramsha, would refer to their language as "deshi", meaning native or vernacular. This method of calling one's native language as "deshi" has continued into the modern Indo-Aryan languages.

बौद्ध आणि शैव ह्या धर्मपंथांनीही अपभ्रंश भाषेमध्ये साहित्य निर्माण केलेले असले; तरी अपभ्रंशात जैनपंथीयांचे साहित्य तुलनेने अधिक मोठ्या प्रमाणात आढळते. जैनांच्या अपभ्रंश-साहित्याच्या ह्या परंपरेतील जोइन्दु ह्यांच्या *परमात्मप्रकाश* आणि *योगसार*, देवसेन ह्यांची *सावयधम्म* दोहा, जिनदत्त सूरी ह्यांच्या *उपदेशरसायन* आणि *कालस्वरूप कुलक* ह्या धर्मपर रचना लक्षणीय आहेत. अपभ्रंश भाषेत स्वयंभू ह्यांचे *पउमचरिउ* हे प्रबंधकाव्य जैन परंपरेतील रामकथेवर आधारित आहे. प्रबंधकाव्य म्हणजे आरंभापासून शेवटापर्यंत एखादी मुख्य कथा सांगणारे काव्य, ज्यामध्ये उपकथानके क्वचित येऊ शकतात. पुष्पदन्त ह्यांची *महापुराण*, *णायकुमारचरिउ* आणि *जसोधरचरिउ* ही प्रबंधकाव्येही प्रसिद्ध आहेत. कनकामर मुनी ह्यांची *करकण्डचरिउ* ही अपभ्रंश-काव्याच्या परंपरेतील महत्त्वाची काव्यकृती मानण्यात येते. धनपालाची *भविसयत्तकहा* आणि हरिभद्राची *समराइच्चकहा* ह्यांसारख्या रचना आधुनिक साहित्याभ्यासकांचेही लक्ष वेधून घेत आहेत.

संदर्भ:


- *अपभ्रंश भारती : शोधपत्रिका*. (ऑक्टोबर १९९५) अपभ्रंश-साहित्य-अकादमी, राजस्थान. https://www.jainfoundation.in/JAINLIBRARY/books/apbhramsa_bharti_1995_07_521855_hr6.pdf
- गुणे, पांडुरंग दामोदर आणि दलाल, सी. डी. (संपा०). (१९२३) *भविसयत्तकहा बाय धनपाल*. गायकवाड ओरिएण्टल सीरिज. सेंट्रल लायब्ररी, बडोदे.
- तगारे, गणेश वासुदेव. (१९४८) *हिस्टॉरिकल ग्रामर ऑफ अपभ्रंश*. डेक्कन कॉलेज, पुणे.
- तगारे, गणेश वासुदेव. (२०२३) *पाली साहित्याचा इतिहास*. मिहाना पब्लिकेशन्स, पुणे. (मूळ १९८१च्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण.)


अधिक वाचनासाठी महाजालावरील संदर्भ-दुवे:

- मराठी विश्वकोशातील अपभ्रंश भाषा ही नोंद : *https://vishwakosh.marathi.gov.in/26619/*
- मराठी विश्वकोशातील अपभ्रंश साहित्य ही नोंद : https://vishwakosh.marathi.gov.in/26620/
- ब्रिटानिका शब्दकोशातील अपभ्रंश भाषाविषयक नोंद : *https://www.britannica.com/topic/Apabhramsha-language*


सुशान्त देवळेकर हे मराठी भाषा, व्याकरण, महाराष्ट्राचा व मराठीचा इतिहास ह्यांचे अभ्यासक असून, मुक्तसेवी संशोधक, लेखक आणि अध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

Sushant Devlekar is a scholar of Marathi language, grammar and the history of Maharashtra and Marathi. He works as an independent researcher, writer and educator.


For example, Saint Dyaneshwar refers to Marathi as “deshi” in *Dyaneshwari*. Although both Buddhist and Shaiva traditions have used Apabhramsha as their language of literature, most works have been written by Jain Authors. Jain literary Apabhramsha works like *Paramatma Prakash* and *Yogasara* by Joidndu, *Sawayadharma Doha* by Devsena, *Updesharasayana* and *Kalaswarupa Kulaka* by Jinadatta Suri are noteworthy works. A prominent narrative poem is *Paumachariu* by Svayambhu, based on the Jain Ramayana. Such narrative poems or *Prabandha-kavyas*, tell a main story from beginning to end, sometimes also incorporating sub-plots. Some well known Apabhramsha prabandha-kavyas include Mahapurana, Nayakumaracharíu, and Jasodharachariu by Pushpadanta. Karakandachariu by Kanakāmara Muni is also regarded as a significant poetic work. Compositions such as *Bhavisayattakaha* by Dhanapala and *Samarāichchakaha* by Haribhadra have also drawn the attention of modern literary scholars.

**References:**


- *Apabhramsha Bharati: Shodh Patrika*. (October 1995). Apabhramsha Sahitya Academy, Rajasthan. https://www.jainfoundation.in/JAINLIBRARY/books/apbhramsa_bharti_1995_07_521855_hr6.pdf
- Gune, Pandurang Damodar & Dalal, C. D. (Eds.). (1923). *Bhavisayattakaha* by Dhanapala. Gaekwad Oriental Series, Central Library, Baroda.
- Tagare, Ganesh Vasudev. (1948). *Historical Grammar of Apabhramsha*. Deccan College, Pune.
- Tagare, Ganesh Vasudev. (2023). *History of Pali Literature*. Mihana Publications, Pune. (Reprint of the 1981 edition.)


Online Links for more information:

- Entry on Apabhramsha Language in Marathi Vishwakosh: https://vishwakosh.marathi.gov.in/26619/
- Entry on Apabhramsha Literature in Marathi Vishwakosh: https://vishwakosh.marathi.gov.in/26620/
- Entry on Apabhramsha in the Britannica Dictionary: https://www.britannica.com/topic/Apabhramsha-language


Prabha Kulkarni is a Master’s student of literary and cultural studies. She is a writer and an artist active in the field of museology, curation, art and culture.

## Learn a Marathi word with MLLI

वाडा / *Wada*
vāḍā
नाम, पुं. / **Noun, m.**

### अर्थ / Meaning

दगड किंवा विटा ह्यांनी बांधलेले, खास प्रकारची रचना असलेले मोठे घर; वडिलोपार्जित घर.

A large house built with stones or bricks, having a special type of architecture; an ancestral house.

गुरांच्या राहण्यासाठी बांधलेली चारा, पाणी इत्यादींची सोय असलेली जागा.
A place built for cattle, equipped with provisions for fodder, water, and other necessities.

### उदाहरणे / Examples

१. शनिवारवाडा हे पुण्यातील लोकप्रिय पर्यटन-स्थळ आहे.
Shanivar *Wada* is a popular tourist destination in Pune.

२. आईने रानातून परतलेल्या गुरांना वाड्यात बांधले.
Mother tied the cattles in the *wada* after they returned from the fields.

### वाडा / *Wada* (vāḍā)

दिया : रामू, आमच्या बरोबर *वाडा चिरेबंदी* हे नाटक बघायला येणार ?

रामू : आवडेल, दिया.

दिया : तुला माहितीय, *वाडा चिरेबंदी — ओल्ड स्टोन मॅन्शन* हे महेश एलकुंचवार यांचं भारतभर सादर होणारं मराठी नाटक आहे.

रामू : हो, आम्ही 'इंट्रोडक्शन टू ड्रामा अँड थिएटर'च्या वर्गात या नाटकाविषयी आणि त्यातल्या *वाड्या*विषयी चर्चा केली होती. *वाडा* म्हणजे दगड किंवा विटा वापरून बांधलेलं खूप मोठं घर.

दिया : हो. आणि, नाटकात दाखवलंय तसं काही वाडे वडिलोपार्जितही असतात.

रामू : महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे *वाडे* असतात.

दिया : अरे, आम्ही लवकरच पुण्यातले काही *वाडे* बघायला जाणार आहोत. तूही ये आमच्याबरोबर.

रामू : कूल. आणि, *वाडा चिरेबंदी* पाहायलाही येईन.

Diya: Ramu, will you come to see the play, *Wada Chirebandi* with us?

Ramu: I would love to, Diya.

Diya: You know, *Wada Chirebandi — Old Stone Mansion* — is Mahesh Elkunchwar's Marathi play performed all over India.

Ramu: Yes. We discussed the play and the *wada* in it in our 'Introduction to Drama and Theatre' class. A *wada* is a very large house built using stones or bricks.

Diya: That's right, and a *wada* can also be an ancestral house, like in the play.

Ramu: In Maharashtra, different types of *wadas* are found in different places.

Diya: Oh, we're going to visit some *wadas* in Pune soon. You should come with us too.

Ramu: Cool! And, I'll also come to see *Wada Chirebandi*.

**After coming back from the play, Diya and Ramu did the following exercise of filling in the blanks. Would you like to try?**

1. *Wada* means ___________.
2. *Wada Chirebandi* is a ___________.

**Provide the English meanings of the following Marathi words:**

- नाटक :
- आमच्याबरोबर :


उपक्रम-संकल्पना आणि संपादक: डॉ. आशुतोष पोतदार
Initiative Concept and Editor: Dr. Ashutosh Potdar

संपादन-सहकार्य: डॉ. अनघा मांडवकर आणि पूर्वी राजपुरिया
Editorial Support: Dr. Anagha Mandavkar and Purvi Rajpuria

रचना: रुव नारंग
Design: Ruve Narang



© Marathi Language and Literature Initiative
Department of Design, Art & Performance,
FLAME University, Pune.